ePaper
वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827
महाईन्यूज™
WWW.MAHAENEWS.COM | बुधवार, दि. 06 मे 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## शबरीमला मंदिरासंदर्भातली याचिका केराच्या टोपलीत का फेकली नाहीत?




पान 3 वरुन...

बांधकाम प्रदूषणावर महापालिकेची कडक कारवाई

### राजीनाम्यास स्पष्ट नकार; उद्धव ठाकरेंसह इंडिया आघाडीचा पाठिंबा असल्याचा दावा

# पराभवानंतर ममतांचा पलटवार; "हा पराभव नाही, कटकारस्थान!"



महाईन्यूज । कोलकाता

**पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेस पक्षाचा दारुण पराभव झाला. या पराजयानंतर ममता बॅनर्जी यांनी पत्रकार परिषद घेतली. आम्ही निवडणूक हरलेलो नाही. आम्हाला हरवलं गेलं आहे. भाजपनं निवडणूक आयोगाचा वापर करुन निवडणूक जिंकली असल्याचा गंभीर आरोप बॅनर्जी यांनी केला.**

आमचा लढा भाजप विरोधात नव्हे, तर निवडणूक आयोगाशी होता. मी माझ्या उभ्या आयुष्यात अशा प्रकारची निवडणूक पाहिलेली नाही. निवडणूक आयोग मुख्य व्हिलन असल्याचं ममता बॅनर्जी म्हणाल्या. 'भाजपनं निष्पक्षपणे निवडणूक लढवली असती आणि विजय मिळवला असता तर माझी कोणतीही तक्रार नसती. पण आम्ही हरलेलो नाही. भाजपनं विजय चोरलेला आहे. त्यांनी एसआयआरचा उपयोग करुन ९० लाख मतदारांची नावं हटवली. आम्ही न्यायालयात गेल्यावर ३२ लाख नावं पुन्हा मतदारयाद्यांमध्ये जोडण्यात आली. पण यानंतर आणखी ७ लाख नावं जोडली गेली,' अशी आकडेवारी बॅनर्जी यांनी सांगितली.

'मी माझ्या आयुष्यात अशा प्रकारची निवडणूक पाहिलेली नाही. २००४ पासून असा प्रकार पाहिला नव्हता. हा प्रकार भयंकर आहे. पंतप्रधान मोदी आणि गृहमंत्री अमित शहांनी मिळून आमचा पराभव केला. आमच्या पराजयासाठी हरतऱ्हेचे प्रयत्न करण्यात आले. भाजप कार्यकर्त्यांनी आमच्या कार्यकर्त्यांना मारहाण केली,' असा आरोप ममता बॅनर्जी यांनी केला.

आम्ही निवडणूक हरलेलो नाही. त्यामुळे राजीनामा देण्याचा प्रश्नच येत नाही, असं ममता बॅनर्जी म्हणाल्या. तुम्ही राजभवनला जाणार का, असा प्रश्न त्यांना विचारण्यात आला. त्यावर आम्ही नैतिकदृष्ट्या जिंकलेलो आहोत. मी लोकभवनला जाऊन राजीनामा देणार नाही. पक्षाच्या सदस्यांसोबत चर्चा करुन पुढील रणनीती ठरवेन. मी आता भाजपचे अत्याचार आणखी सहन करणार नाही. मी रस्त्यावर परतेन. आमची लढाई भाजपशी नव्हती, तर निवडणूक आयोगाशी होती. निवडणूक आयोगानं भाजपसाठी काम केलं, असा दावा त्यांनी केला.

इंडिया आघाडी माझ्यासोबत आहे. सोनिया गांधींनी मला फोन केला होता. राहुल गांधी, अरविंद केजरीवाल, उद्धव ठाकरे, हेमंत सोरेन आणि तेजस्वी यादव यांनीही मला फोन केले. इंडिया आघाडी तुमच्या सोबत असल्याचा विश्वास त्यांनी दिला. अखिलेश यादव उद्या पश्चिम बंगालमध्ये येत आहेत, अशी माहिती त्यांनी दिली.



### ममतांचा आक्रमक पवित्रा

पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीतील पराभवानंतर ममता बॅनर्जी यांनी आक्रमक भूमिका घेत "आम्ही हरलो नाही, आम्हाला हरवलं गेलं" असा गंभीर आरोप करत भाजप आणि निवडणूक आयोगावर थेट निशाणा साधला. निवडणूक प्रक्रियेत गैरप्रकार झाल्याचा दावा करत मतदार याद्यांमधून लाखो नावे वगळल्याचे त्यांनी सांगितले. राजीनामा देण्याचा प्रश्नच येत नसल्याचे स्पष्ट करत त्यांनी पुढील रणनीती पक्षासोबत ठरवणार असल्याचे म्हटले. तसेच उद्धव ठाकरे, सोनिया गांधी, राहुल गांधी यांसह इंडिया आघाडीतील नेत्यांनी पाठिंबा दर्शवल्याचा उल्लेख करत भाजपविरोधात लढा अधिक तीव्र करण्याचा इशाराही दिला.

# पहिल्याच दिवशी ४५० एकर जमीन ताब्यात; पुरंदर विमानतळासाठी भूसंपादनाला वेग...

## 'प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य' तत्त्वावर करारनामे; शेतकऱ्यांना थेट खात्यात मोबदला

**महाईन्यूज । पुणे**

**पुरंदर येथील नियोजित छत्रपती संभाजी राजे आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या भूसंपादनाचा मोबदला निश्चित झाल्यानंतर सोमवारपासून (दि . ४) प्रत्यक्षात संपादनास सुरुवात झाली. त्यानुसार पहिल्या दिवशी सुमारे साडेचारशे एकर जमिनीचे करारनामे करण्यात आले. 'प्रथम येणाऱ्या प्रथम प्राधान्य' या तत्त्वावर भूसंपादनाचे काम सुरू करण्यात आले असल्याचे जिल्हा प्रशासनाकडून सांगण्यात आले. करारनाम्यानंतर लगेचच मोबदला देण्यात येणार आहे, असे सांगण्यात आले.**



### भूसंपादन प्रक्रिया वेगात...

पुरंदर विमानतळासाठी भूसंपादनास सुरुवात होताच पहिल्याच दिवशी सुमारे ४५० एकर जमिनीचे करारनामे पूर्ण; 'प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य' तत्त्वावर शेतकऱ्यांना थेट खात्यात मोबदला जमा होणार, तर पहिल्या टप्प्यात ३ हजार एकर संपादनाचे लक्ष्य.

विमानतळासाठी पुरंदर तालुक्यातील सात गावांतील तीन हजार एकर जागा संपादित करण्यात येणार आहे. त्यासाठीची आवश्यक ती सर्व प्रक्रिया यापूर्वीच पूर्ण करण्यात आली आहे. मात्र, जागा मालकांना जागेचा द्यावयाचा मोबदला निश्चित होत नसल्याने प्रत्यक्षात भूसंपादनास सुरुवात झाली नव्हती. मागील आठवड्यात भूसंपादनाचा दर राज्य सरकारकडून अंतिम करण्यात आला. जिल्हा प्रशासनाकडून चार मेपासून मोबदला देऊन जागा ताब्यात घेण्याची प्रक्रिया सुरू करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले होते. त्यानुसार आजपासून प्रत्यक्षात भूसंपादनाला सुरुवात झाली. 'प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य' या तत्त्वावर भूसंपादन करण्यात येणार असल्याचे प्रशासनाने जाहीर केले होते. त्यानुसार आज पहिल्या दिवशी सात गावांतील सुमारे साडेचारशे एकर जागेचे करारनामे करण्यात आले असल्याचे जिल्हा प्रशासनाकडून सांगण्यात आले.

भूसंपादनासाठी लागणाऱ्या निधीसाठी सहा हजार कोटी रुपयांचे कर्ज हुडकोकडून घेण्यास राज्य शासनाने यापूर्वीच दिले आहे. त्यापैकी पहिल्या टप्प्यात पाचशे कोटी रुपयांचा निधी जिल्हा प्रशासनाला यापूर्वी प्राप्त झाला आहे. त्यामुळे प्रत्यक्ष भूसंपादनाच्या कामाला आता सुरुवात झाली आहे. भूसंपादन करताना जागेबरोबरच घरे, झाडे, विहिरी, फळबागा यांचे मूल्यांकन स्वतंत्रपणे करण्यात येणार आहे. पहिल्या टप्प्यात विमानतळासाठी तीन हजार एकर जमिनींचे संपादन करण्यात येणार आहे, तर बाधित शेतकऱ्यांनी यापूर्वी जिल्हा प्रशासनाकडे संमतीपत्रे सादर केली आहेत. भूसंपादनाची प्रक्रिया पारदर्शकपणे पार पाडण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्यामार्फत थेट बाधित शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे जमा केले जाणार आहे.

# पुणे महापालिकेची ११ रुग्णालये होणार 'मल्टिस्पेशालिटी'

**महाईन्यूज । पुणे**

**शहरातील नागरिकांना दिल्या जाणाऱ्या आरोग्य सुविधांचा दर्जा सुधारण्यासाठी महापालिका प्रशासनाने पावले उचलली आहेत. यासाठी शहरातील ११ रुग्णालयांचे रुपांतर अत्याधुनिक रुग्णालयांमध्ये (मल्टिस्पेशालिस्ट) केले जाणार आहे.**

### पाहणीनंतर सविस्तर आराखडा

महापालिकेने निवडलेल्या या ११ रुग्णालयांमध्ये महापालिकेचे भवन तसेच विद्युत विभागामार्फत संयुक्त पाहणी केली जाणार आहे. या दोन्ही विभागातील वरिष्ठ अधिकारी या पाहणीत सहभागी होणार आहेत. या पाहणीनंतर या महापालिकेच्या रुग्णालयात आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधा, आधुनिक वैद्यकीय उपकरणे, विद्युत व्यवस्था तसेच डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांची उपलब्धता याबाबतचा सविस्तर आराखडा तयार करण्यात येणार आहे, अशी माहिती आरोग्य विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली.




त्यामध्ये सहा प्रसूतिगृहे आणि पाच बाह्यरुग्ण विभाग असलेल्या रुग्णालयांचा समावेश आहे. त्यासाठी स्थायी समितीकडून सुमारे ९० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

महापालिकेच्या स्थायी समितीचे अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी महापालिकेचा अर्थसंकल्प सादर करताना नागरिकांना चांगल्या आरोग्य सुविधा पुरविण्याचे आश्वासन दिले होते. त्यानुसार हा निर्णय घेण्यात आला आहे. गरीब आणि मध्यमवर्गीय नागरिक मोठ्या प्रमाणावर आजही महापालिकेच्या आरोग्य सेवेवर अवलंबून आहेत. शहरातील विविध भागांत महापालिकेचे ५४ बाह्यरुग्ण विभाग आणि १९ प्रसूतिगृहे कार्यरत आहेत.

या केंद्रांमध्ये दररोज सुमारे ११ ते १२ हजार रुग्ण उपचारासाठी येतात. अनेक रुग्णालयांमध्ये मनुष्यबळाची कमतरता, अपुरी यंत्रणा तसेच प्रशासकीय विलंब यामुळे रुग्णांना सेवा देताना अडचणी निर्माण होतात. मंगळवार पेठेत असलेले कमला नेहरू हे एकमेव मोठे रुग्णालय महापालिकेचे आहे. यामध्ये विविध आजारांवर उपचार होतात. गेल्या काही वर्षांमध्ये शहराची वाढत असलेली लोकसंख्या आणि आरोग्य सुविधांची गरज लक्षात घेता महापालिकेने इतर रुग्णालयांचे उन्नतीकरण करण्याचा निर्णय घेतला आहे.

### निवड करण्यात आलेली रुग्णालये


महापालिकेने पहिल्या टप्प्यात ११ रुग्णालयांची निवड केली आहे. यामध्ये येरवडा येथील राजीव गांधी रुग्णालय, वडगाव येथील लायगुडे रुग्णालय, बोपोडी येथील संजय गांधी रुग्णालय, शिवाजीनगर येथील दळवी रुग्णालय आणि गाडीखाना येथील मालती काची रुग्णालय यांची निवड करण्यात आली आहे. तसेच, भवानी पेठ येथील सोनवणे प्रसूतिगृह, राजमाता जिजाऊ नर्सिंग होम, धनकवडी रुग्णालय, वानवडी येथील शिवरकर रुग्णालय, कोथरूड येथील सुतार रुग्णालय आणि बोपोडी येथील खेडेकर रुग्णालयाचा समावेश आहे.

# बांधकाम प्रदूषणावर महापालिकेची कडक कारवाई; १५० हून अधिक बिल्डरांना नोटिसा

## धूळ व ध्वनी प्रदूषणावर नियंत्रणासाठी नियमावली; उल्लंघन केल्यास परवानगी स्थगितीचा इशारा

**महाईन्यूज ।** पिंपरी-चिंचवड

**पिंपरी-चिंचवड शहरात वाढत्या बांधकाम गृह व व्यापारी प्रकल्पांमुळे होणारे धूळ व वायू प्रदूषण कमी करण्यासाठी महापालिकेच्या बांधकाम विभागाकडून कडक नियमावली लागू केली आहे. त्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या प्रकल्पांवर दंडात्मक कारवाई करण्यात येत आहे. दीडशेहून अधिक बांधकाम व्यावसायिकांना नोटीसा बजावण्यात आल्या असून, बांधकाम परवानगी स्थगित करण्याचा इशारा देण्यात आला आहे.**



### रात्री दहा ते सकाळी सातपर्यंत बांधकामांना बंदी

पिंपरी-चिंचवड शहरातील गृहनिर्माण बांधकामामुळे वायु व ध्वनी प्रदूषणात वाढ होत आहे. त्यानुसार महापालिकेकडून संबंधित बांधकामांवर नियंत्रण ठेवत नियमावली तयार करण्यात आली आहे. रात्री दहा ते सकाळी सातपर्यंत बांधकामे बंद ठेवण्यात येत आहेत. याशिवाय अन्य नियमानुसार बांधकाम व्यावसायिकांनी काम करावे, असे निर्देश दिलेले आहेत. तसेच प्रत्येकाने उपाययोजनांवर लक्ष देण्यास सांगण्यात आले आहे. मात्र, नियमांचे उल्लंघन करणार्यांना नोटीसा बजावण्यात येत आहेत, असे महापालिकेचे सहशहर अभियंता सुनील भागवानी यांनी सांगितले.

वेगाने वाढणारे शहरीकरण, वाढती वाहनसंख्या आणि मोठ्या प्रमाणावर सुरू असलेली बांधकामे यामुळे शहरात वायू प्रदूषणाची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत चालली आहे. शहरातील प्रमुख रस्ते, औद्योगिक परिसर तसेच, बांधकाम सुरू असलेल्या भागांमध्ये धुळीचे प्रमाण वाढले असून, वाहनांच्या धुरामुळे हवेची गुणवत्ता खालावत असल्याचे चित्र दिसत आहे.

शहरातील वाकड, ताथवडे, पुनावळे, रावेत, किवळे, भोसरी, चिखली, मोशी, निगडी, पिंपरी, तळवडे, पिंपळे गुरव, कासारवाडी, सांगवी, दापोडी, आकुर्डी, पिंपळे निलख, रहाटणी, काळेवाडी, चर्होली, वडमुखवाडी परिसरात औद्योगिक आणि वाहतूक हालचाली मोठ्या प्रमाणावर होत असल्याने प्रदूषणाचे प्रमाण अधिक आहे. तसेच, महामेट्रो, उड्डाण पूल आणि रस्ते विस्ताराची कामे सुरू असल्याने धुळीचे प्रमाण वाढत आहे. अनेक ठिकाणी बांधकाम साहित्य उघड्यावर ठेवले जात असल्याने वार्यासोबत धूळ उडून वातावरण दूषित होत असल्याचेही निदर्शनास येत आहे. हवेत सूक्ष्म धूलिकणांचे प्रमाण वाढल्यास दमा, श्वसनाचे आजार, एलर्जी तसेच, डोळ्यांच्या तक्रारी वाढत आहेत. विशेषतः लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि श्वसनाचे आजार असलेल्या व्यक्तींना याचा अधिक त्रास होत आहे. घरातील साहित्यांवर धुळीचे स्थर जमा होतात. रात्री दहानंतर बांधकाम सुरू ठेवल्याने कर्कश आवाजाने रहिवाशी हैराण झाले अहेत. मोठ्या बांधकाम प्रकल्पांमुळे परिसरात धूळ उडणे, रस्त्यांवर माती साचणे आणि हवेची गुणवत्ता खालावणे, या सारख्या तक्रारी नागरिकांकडून करण्यात येत आहेत.

महापालिकेकडून बांधकामांवर पाणी फवारणी करणे, धूळ रोखण्यासाठी जाळ्या (ग्रीन नेट) बसविणे, रस्ते नियमित स्वच्छ करणे आणि नियमांचे पालन करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. मात्र, प्रत्यक्षात बांधकाम व्यावसायिकाकडून त्यांची काटेकोरपणे अंमलबजावणी होताना नाही. अनेक भागात सर्रासपणे नियमाचे उल्लंघन केले जात असून, उपाययोजनाकडे दुर्लक्ष होत असल्याचे नागरिक तीव्र संताप व्यक्त करत आहेत.

तक्रारींची दखल घेऊन महापालिका प्रशासनाने प्रत्यक्ष बांधकाम स्थळाची पाहणी केली. त्यानुसार दीडशेहून अधिक बांधकाम व्यावसायिकांना नोटीस बजावण्यात आल्या आहेत. नियमानुसार तातडीने उपाययोजना न केल्यास बांधकाम परवानगीस स्थगिती देण्यात येण्याचा इशारा बांधकाम परवानगी विभागाने दिला आहे.

# नसरापूर घटनेवरून पिंपरी-चिंचवड सभागृह संतप्त; कामकाज ३० मिनिटे तहकूब

**महाईन्यूज ।** पिंपरी-चिंचवड

**भोर तालुक्यातील नसरापूर येथे ४ वर्षीय चिमुकलीवर झालेल्या अत्याचार आणि हत्येच्या अमानुष घटनेचे तीव्र पडसाद आज पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत उमटले. घटनेचा निषेध नोंदवत आणि पीडित चिमुकलीला श्रद्धांजली अर्पण करून सभागृहाचे कामकाज तब्बल ३० मिनिटांसाठी तहकूब करण्यात आले.**



### अमानुष घटनेचा तीव्र निषेध...

नसरापूर येथील चिमुकलीवरील अत्याचार व हत्येच्या घटनेवरून पिंपरी-चिंचवड महापालिका सभागृहात संतापाची लाट; पीडितेला श्रद्धांजली अर्पण करत कामकाज ३० मिनिटांसाठी तहकूब, आरोपींना कठोर शिक्षेची एकमुखी मागणी.

सभेच्या प्रारंभीच नसरापूर येथील घटनेचा उल्लेख करण्यात आला. त्यानंतर संपूर्ण सभागृहाने उभे राहून मौन पाळत पीडित चिमुकलीला भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली. या दुर्दैवी घटनेमुळे संपूर्ण पुणे जिल्हा हादरला असून समाजात संताप आणि हळहळ व्यक्त होत असल्याच्या भावना लोकप्रतिनिधींनी व्यक्त केल्या.

श्रद्धांजली प्रस्तावावेळी विविध पक्षांच्या महिला नगरसेविकांनी संतप्त प्रतिक्रिया नोंदवल्या. “अशा नराधमांना समाजात स्थान नाही. आरोपींना कठोरातील कठोर आणि तात्काळ फाशीची शिक्षा झाली पाहिजे,” अशी जोरदार मागणी महिला लोकप्रतिनिधींनी केली. काही नगरसेविका बोलताना भावुक झाल्याचे चित्र सभागृहात पाहायला मिळाले. सभागृहात झालेल्या चर्चेदरम्यान महिला आणि बालकांच्या सुरक्षेचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला. शहर तसेच ग्रामीण भागात वाढत्या अत्याचाराच्या घटनांबाबत चिंता व्यक्त करत प्रशासन आणि पोलिसांनी अधिक कठोर उपायोजना राबवाव्यात, अशी मागणी सदस्यांनी केली. या अमानुष घटनेच्या निषेधार्थ आणि पीडितेला श्रद्धांजली म्हणून सभागृहाचे कामकाज अर्ध्या तासासाठी तहकूब करण्याचा निर्णय महापौर रवी लांडगे यांनी घेतला.



## भूमिका

**पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकांचे निकाल केवळ राजकीय समीकरणांमुळे नव्हे, तर निवडणूक प्रक्रियेभोवती निर्माण झालेल्या प्रश्नचिन्हांमुळेही विशेष ठरले. या निवडणुकांमध्ये भारतीय जनता पक्षाने पश्चिम बंगाल, आसाम आणि पुद्दुचेरीत यश मिळवत आपली पकड अधिक मजबूत केली.**

# नियामकांच्या निष्क्रियतेची निवडणूक




तर केरळमध्ये काँग्रेस आणि तमिळनाडूत अभिनेता विजय यांच्या तमिळगा वेत्री कळघमने नवा पर्याय म्हणून उदय घेतला. मात्र या सर्व घडामोडींवर छाया टाकणारा मुद्दा ठरला तो म्हणजे मतदारयाद्यांच्या सखोल विशेष फेरतपासणीची (एसआयआर) मोहीम. पश्चिम बंगालमध्ये सत्तांतर घडवून आणणे हे भाजपसाठी मोठे राजकीय यश मानले जाते. ममता बॅनर्जी यांच्या दीर्घ कारभाराविरोधातील नाराजी, महिलांच्या सुरक्षेचा मुद्दा आणि 'परिवर्तन'ची हाक यामुळे मतदारांनी भाजपला संधी दिली. दुसरीकडे तमिळनाडूत गेली सहा दशके सत्तेत असलेल्या द्रमुक आणि अण्णा द्रमुक या पारंपरिक पक्षांना बाजूला सारत विजय यांच्या पक्षाने मतदारांचा कौल मिळवला. केरळमध्ये डाव्या आघाडीविरोधातील असंतोषाचा फायदा काँग्रेसला झाला, तर आसाममध्ये हिमंता बिस्वा सरमा यांच्या नेतृत्वाखाली भाजपने आपला गड कायम राखला.

या निकालांतून मतदारांनी बदलाची स्पष्ट इच्छा व्यक्त केल्याचे दिसते. मात्र या प्रक्रियेच्या पारदर्शकतेवरच प्रश्न उपस्थित झाले. बिहार, पश्चिम बंगाल आणि तमिळनाडू येथे मोठ्या प्रमाणावर मतदारयाद्यांमधून नावे वगळण्यात आल्याच्या घटना समोर आल्या. अधिकृत कारणे म्हणून मृत, दुबार किंवा स्थलांतरित मतदारांची नावे हटवली गेल्याचे सांगितले गेले, परंतु प्रत्यक्षात अल्पसंख्याक समाजाच्या नावांवर अधिक गंडांतर आले, असे आरोप विरोधकांनी केले. निवडणूक आयोगावर सत्ताधारी पक्षाला मदत केल्याचा आरोप झाला, जो लोकशाहीसाठी चिंताजनक आहे. निवडणुका मुक्त, निष्पक्ष आणि पारदर्शक पद्धतीने घेण्याची जबाबदारी आयोगावर असते. अशा परिस्थितीत आयोगाच्या निर्णयांवर संशय निर्माण होणे हे लोकशाही संस्थांच्या विश्वासार्हतेस धक्का देणारे आहे. याच पार्श्वभूमीवर मुख्य निवडणूक आयुक्तांविरुद्ध महाभियोगाचा प्रस्ताव मांडला जाणे ही गंभीर बाब आहे. लोकशाही केवळ निवडणुकीच्या निकालांवर उभी नसते, तर त्या प्रक्रियेवरील जनतेच्या विश्वासावर टिकून असते. जर मतदारयादीच संशयास्पद ठरल्या, तर निवडणुकीची वैधता प्रश्नांकित होते. त्यामुळे एसआयआरसारख्या मोहिमा राबविताना अत्यंत पारदर्शकता, निष्पक्षता आणि उत्तरदायित्व आवश्यक आहे.

एकूणच, या निवडणुकांत राजकीय विजय-पराजयापेक्षा अधिक महत्त्वाचा मुद्दा ठरतो तो म्हणजे लोकशाही संस्थांची विश्वसनीयता. राजकीय पक्ष येतील-जातील, सत्तांतर होईल; पण निवडणूक प्रक्रियेवरील विश्वास डळमळीत झाला, तर ती लोकशाहीसाठी धोक्याची घंटा ठरेल. त्यामुळे आता गरज आहे ती निवडणूक व्यवस्थेवरील विश्वास पुन्हा प्रस्थापित करण्याची.

## प्रासंगिक »

### जे असेल त्यात समाधानी असावे

**एकदा एक भुंगा गुंजारव करत फिरत होता. तेव्हा त्याला एक चिमणी म्हणाली, 'मूर्खा, तू जो एकसारखा एकच आवाज काढत बसतो तो कशासाठी?**

वसंतऋतूत गाणारी कोकिळा, हिरव्यागार झाडाच्या फांदीवर बसून गाणारा बुलबुल यांची बरोबरी तुला कधीतरी करता येईल का?

तसे जमत नाही तर भिकार सूर एकसारखा काढून तू लोकांना कंटाळा का आणतोस?'

भुंगा म्हणाला, 'अगं चिमणे, परमेश्वराने या जगात प्रत्येक व्यक्तीत निराळेपणा ठेवला आहे.

वैचित्र्य असणे हा जगाचा नियम आहे, दुसऱ्याचा हेवा न करता ज्याने त्याने आपापल्या शक्तीचा उपयोग केला तर त्यात वाईट काय?

जेव्हा कोकिळेचे गाणे बंद पडते किंवा बुलबुल मुका होतो तेव्हा एखाद्या सुंदर बागेत निर्जनता भासू न देण्यात माझ्या गरीबाचा उपयोग होतो.'

- तात्पर्य : सर्व मनासारखे होत नाही, तर जे असेल त्यात समाधानी असावे.

नसरापूर येथील साडेतीन वर्षांच्या चिमुरडीवरील अत्याचाराची घटना ही केवळ एका कुटुंबाची शोकांतिका नाही, तर संपूर्ण समाजाच्या विवेकाला हादरवणारी आहे.

# 'न्याय द्या, तरच भेटीला या', हा 'हॅशटॅग' बनला तर?



"माझ्या मुलीला न्याय मिळाल्याशिवाय कोणीही सांत्वनासाठी येऊ नये," अशी त्या हतबल वडिलांची हाक ही आजच्या व्यवस्थेवरचा कठोर आरोप आहे. या वेदनेतून एकच प्रश्न उभा राहतो—आपल्या न्यायव्यवस्थेची गती आणि परिणामकारकता नेमकी कुठे हरवली आहे?

अशा घटनांनंतर राजकीय नेत्यांची धावपळ, माध्यमांसमोर दिले जाणारे 'बाइट्स' आणि "जलद न्याय देऊ" यासारखी आश्वासने ही आता साचेबद्ध झाली आहेत. प्रत्यक्षात मात्र गुन्हे उघडकीस येणे, दोषारोपपत्र दाखल होणे, खटले चालणे आणि शिक्षा होणे या प्रत्येक टप्प्यावर विलंबच दिसून येतो. त्यामुळेच पीडितांना न्याय मिळण्याऐवजी निराशा हाती येते. नसरापूर प्रकरणातील आरोपीवर यापूर्वीही गुन्हे होते, तरी तो मोकाट कसा फिरत होता, हा प्रश्न अधिक गंभीर आहे. याचा अर्थ केवळ कायदे अपुरे नाहीत, तर त्यांची अंमलबजावणीही त्रुटीपूर्ण आहे. अनेक वेळा तांत्रिक बाबींमुळे आरोपी सुटतात, साक्षीदार दडपले जातात किंवा तपासातील त्रुटींमुळे खटले कमकुवत होतात. परिणामी दोषसिद्धीचे प्रमाण अत्यल्प राहते. 'पोक्सो' कायद्यांतर्गत हजारो गुन्हे नोंदवले जात असताना दोषसिद्धीचे प्रमाण अत्यंत कमी आहे, ही वस्तुस्थिती अधिक चिंताजनक आहे. यामुळे गुन्हेगारांना कायद्याची भीती उरत नाही. "शक्ती"सारखे कठोर कायदे प्रस्तावित होतात, पण ते प्रत्यक्षात येत नाहीत किंवा अंमलबजावणीतच अडकतात. केवळ कठोर कायदे बनवून उपयोग नाही, तर त्यांची काटेकोर अंमलबजावणी आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर राजकीय इच्छाशक्ती, पोलिस तपासाची गुणवत्ता, न्यायालयीन प्रक्रिया आणि साक्षीदार संरक्षण यामध्ये मूलभूत सुधारणा करणे अत्यावश्यक आहे. महिला आयोग, बालसुरक्षा यंत्रणा यांना सक्षम नेतृत्व आणि साधने मिळाली पाहिजेत. अन्यथा या संस्था केवळ औपचारिक राहतील.

नसरापूरच्या बापाची हाक ही केवळ एका व्यक्तीची नाही, तर संपूर्ण समाजाची आहे. "न्याय मिळाल्याशिवाय येऊ नका" हा संदेश राज्यकर्त्यांसाठी इशारा आहे. जर ही हाक दुर्लक्षित राहिली, तर लोकांचा न्यायव्यवस्थेवरील विश्वास अधिकच ढासळेल. त्यामुळे आता वेळ आली आहे ती शब्दांपेक्षा कृतीची—आणि तीही 'जलद' व ठोस.

## ।। अभंगवाणी ।।



समचरणदृष्टि विटेवरी साजिरी ।
तेथें माझी हरी वृत्ति राहो ॥१॥

आणीक न लगे मायिक पदार्थ ।
तेथें माझें आर्त्त नको देवा ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# गडचिरोलीतील वनक्षेत्र खाणकामासाठी खुलं; १३७ हेक्टर जमीन लॉयड्सकडे...

## हेदरी, बांडे व परसलगोंदी परिसरातील लोहखनिज उत्खननासाठी जमीन वळती

**महाईन्यूज । गडचिरोली**

**राज्य सरकारने गडचिरोली जिल्ह्यातील १३७.०७७ हेक्टर राखीव व संरक्षित वनजमीन खाणकामासाठी वळती करण्यास मंजुरी दिली आहे. ही जमीन लॉयड्स मेटल्स अँड एनर्जी लिमिटेड या कंपनीला दिल्याचे सोमवारी जारी करण्यात आलेल्या आदेशात म्हटले आहे.**



गडचिरोली जिल्ह्यातील हेडरी, बांडे आणि परसलगोंदी (एटापल्ली परिक्षेत्र) येथील विद्यमान खाणींच्या शेजारील भागात कमी प्रतीच्या लोहखनिजाच्या (हेमाटाइट उत्खननासाठी हि वनजमीन देण्यात आली आहे. संबंधित कंपनी सध्या गडचिरोली जिल्ह्यात सुमारे ३४८ हेक्टर क्षेत्रावर खाणकाम करत आहे.

वनजमीन वळविण्याचा प्रस्ताव मार्च २०२४मध्ये नागपूर येथील अतिरिक्त प्रधान मुख्य वनसंरक्षक व नोडल अधिकाऱ्यांनी वन (संरक्षण) अधिनियम १९८०अंतर्गत सादर केला होता. राज्य सरकारमार्फत हा प्रस्ताव जून २०२४मध्ये केंद्रीय पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालयाकडे पाठविण्यात आला. केंद्र सरकारने मे २०२५मध्ये अटींसह तत्त्वतः मंजुरी दिली होती. त्यानंतर फेब्रुवारी २०२६मध्ये अटींची पूर्तता सादर केल्यानंतर एप्रिल २०२६मध्ये वनजमीन हस्तांतरीत करण्यासाठी अंतिम मंजुरी देण्यात आली.

दरम्यान, या प्रकल्पासाठी स्वतंत्र वन्यजीव मंजुरीची आवश्यकता नाही. गडचिरोली येथील मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) यांनी प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) यांच्या सल्ल्याने ही जमीन प्रमाणित करणे आवश्यक असल्याची अट घालण्यात अली आहे.

### वनजमीन खाणकामासाठी वळती; प्रकल्पाला वेग

गडचिरोली जिल्ह्यातील हेडरी, बांडे व परसलगोंदी (एटापल्ली) परिसरातील १३७ हेक्टर राखीव व संरक्षित वनजमीन लोहखनिज (हेमाटाइट) उत्खननासाठी लॉयड्स मेटल्स अँड एनर्जी लिमिटेडला देण्यास मंजुरी; वन (संरक्षण) अधिनियम १९८० अंतर्गत प्रस्ताव, केंद्र-राज्य पातळीवरील अटींची पूर्तता पूर्ण झाल्यानंतर अंतिम मान्यता, विद्यमान खाणींच्या विस्ताराला चालना आणि प्रकल्पाला वेग.

# भाजपने ८७ नेत्यांची कुमक पाठवूनही केरळ हातून गेले

**महाईन्यूज । नागपूर**

**केरळ जिंकण्यासाठी भाजपने 'इलेक्शन मॅनेजमेंट'चा अनुभव असलेल्या राज्य व विदर्भातील ८७नेत्यांवर जबाबदारी सोपविली होती. हे नेते प्रचारात केरळमध्ये ठाणू मांडून होते. मात्र, त्यानंतरही केरळमध्ये भाजपला यश आले नाही. केरळमध्ये फेल ठरलेले हे नेते बंगालचा विजय साजरा करीत कार्यकर्त्यांचे तोंड गोड करत धन्यता मानताना दिसले.**

भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी केरळ जिंकण्यासाठी महाराष्ट्रातून कुमक पाठविली होती. राज्यभरातील अभ्यासू, बऱ्यापैकी इंग्रजी बोलता येत असणाऱ्या नेत्यांची केरळच्या प्रचारासाठी नियुक्ती करण्यात आली होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह आ. डॉ. परिणय फुके, आ. प्रवीण दटके, माजी आ. अनिल सोले, गिरीश व्यास, आ. सुमित वानखेडे, आ. मिलिंद नरोटे, करण देवतळे, श्वेता महल्ले, रणजित पाटील, प्रताप अडसड यांच्यासह विदर्भातील तब्बल ८७नेत्यांचा यात समावेश होता.

निवडणुका कशा जिंकायच्या याचा अनुभव असलेल्या नेत्यांना यात प्राधान्य देण्यात आले होते. केरळच्या प्रचारात नेमके कोणते मुद्दे उचलायचे, महाराष्ट्रातील विकासाचा आलेख केरळमध्ये कसा मांडायचा आदी बाबींवर फोकस करण्याच्या सूचना संबंधितांना पक्षाकडून देण्यात आल्या होत्या. संबंधित नेत्यांनी चोखपणे ती जबाबदारी पार पाडली. मात्र, निकालात या प्रचाराचा फायदा झाल्याचे दिसले नाही. केरळमध्ये फेल ठरलेले भाजप नेते बंगालच्या निकालाचा गुलाल उधळत कार्यकर्त्यांना मिठाई भरवताना मात्र आघाडीवर होते.

> "पश्चिम बंगाल, आसाममध्ये भाजपला अभूतपूर्व यश मिळाले. विकासाच्या राजकारणाचा हा पुरावा आहे. केरळमध्येही भाजपचे खाते उघडले गेले. ही एक सकारात्मक व ऐतिहासिक सुरुवात आहे. येत्या काळात केरळमध्येही भाजपची सत्ता येईल, यात दुमत नाही."
>
> - आ. डॉ. परिणय फुके, भाजप



### केरळच्या यशात राऊत, केदार, ठाकरे यांचे योगदान

केरळच्या प्रचारात काँग्रेसकडून माजी मंत्री नितीन राऊत, सुनील केदार, आ. विकास ठाकरे, काँग्रेसचे अ. भा. सचिव प्रफुल्ल गुडधे आर्दीवर जबाबदारी सोपविण्यात आली होती. या नेत्यांनी केरळमध्ये मुक्काम करीत प्रचाराची धुरा सांभाळली. महाराष्ट्र प्रभारी असलेले केरळचे नेते रमेश चेन्नीथला यांना प्रचारात साथ दिली. निरीक्षकाची भूमिका बजावत नाराज पदाधिकाऱ्यांना मनविण्यापासून ते मतदारसंघाचे नियोजन करण्यापर्यंतची जबाबदारी पार पाडली. केरळमध्ये काँग्रेसला यश मिळाल्याने या नेत्यांच्या परिश्रमाला पावती मिळाली.

# थलपती विजयचं पंतप्रधानांना उत्तर

## निवडणुकीत मिळवलेल्या या विजयाचं पंतप्रधान मोदींकडून कौतुक

**महाईन्यूज । तामिळनाडू**

**तामिळनाडू विधानसभा निवडणुकीत अभिनेता विजय यांच्या टीव्हीके पक्षाचा मोठा करीश्मा पाहायला मिळाला. टीव्हीके पक्षाने तामिळनाडूत जोरदार मुसंडी मारली. विधानसभा निवडणुकीत 'तमिळगा वेत्री कळघम' (TVK) हा पक्ष सर्वाधिक जागा जिंकत मोठा पक्ष ठरला. टीव्हीकेने १०८ जागा जिंकल्या असल्या तरी पक्ष बहुमतापासून दूर आहे. त्यामुळे सत्ता स्थापनेसाठी थलपती विजय यांना छोट्यामोठ्या पक्षांना बरोबर घ्यावं लागणार आहे. त्या पार्श्वभूमीवर सध्या तामिळनाडूत मोठ्या घडामोडी सुरू असून थलपती विजय हे लवकरच सरकार स्थापन करण्याची शक्यता आहे.**



### थलपती विजयने काय म्हटलं?

थलपती विजय यांनी तामिळनाडू विधानसभा निवडणुकीत टीव्हीकेला मिळालेल्या विजयानंतर पंतप्रधान मोदी यांचे आभार मानले आहेत. पंतप्रधान मोदी यांनी देखील टीव्हीकेने मिळवलेल्या यशाबाबत शुभेच्छा दिल्या होत्या. पंतप्रधान मोदी यांनी दिलेल्या शुभेच्छानंतर थलपती विजय यांनी एक्सवर पोस्ट शेअर करत मोदींचे आभार मानले आहेत. थलपती विजय यांनी म्हटलं की, "धन्यवाद, पंतप्रधान नरेंद्र मोदीजी. लोकांचं कल्याण हेच आमचं एकमेव ध्येय आहे. राजकारणाच्या पलीकडे जाऊन आम्ही तामिळनाडूच्या विकासावर आणि लोकांच्या कल्याणावर लक्ष केंद्रित करू. या आमच्या प्रयत्नासाठी आम्हाला केंद्र सरकारचा पाठिंबा मिळेल अशी अपेक्षा आहे."

दरम्यान, थलपती विजय यांच्या पक्षाने तामिळनाडू विधानसभा निवडणुकीत मिळवलेल्या या विजयाचं पंतप्रधान मोदींनी कौतुक करत शुभेच्छा दिल्या होत्या. त्यानंतर आता थलपती विजय यांनी एक्सवर (ट्विटर) पोस्ट शेअर करत पंतप्रधान मोदींचे आभार मानले आहेत. तसेच तामिळनाडूच्या विकासासाठी केंद्र सरकारच्या पाठिंब्याची अपेक्षा व्यक्त केली आहे.

थलपती विजय यांच्या तमिलगा वेत्री कळघम (टीव्हीके) पक्षाने तमिळनाडूमध्ये इतिहास रचला. द्रविडी राजकारणाभोवती सत्ताखुर्चीचा खेळ करणाऱ्या द्रमुक आणि आण्णाद्रमुक यांना पछाडून विजय यांनी ऐतिहासिक विजय संपादन केला. टीव्हीके पक्षाने १०८ जागा जिंकल्या असल्या तरी पक्ष बहुमतापासून दूर आहे. सत्ता स्थापनेसाठी विजय यांना दुसऱ्या पक्षांना बरोबर घ्यावं लागणार आहे. शिवाय सरकार स्थापन करण्यासाठी आता टीव्हीकेकडून काँग्रेसबरोबर बोलणी सुरु केल्याची माहिती समोर आली आहे.

इंडिया टुडेने सूत्रांच्या हवाल्याने याबाबत वृत्त प्रसिद्ध केलं आहे. थलपती विजय विरोधी पक्षांसोबत युती करण्याची योजना आखत आहे. टीव्हीके काँग्रेससह विदुथलाई चिरुथैगल कची, भारतीय कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी), भारतीय कम्युनिस्ट पक्ष आणि इंडियन युनियन मुस्लिम लीग यांच्याशी युतीबाबत चर्चा करण्याची तयारी करत आहे. या पक्षांना लवकरच चर्चेसाठी निमंत्रण पाठवले जाईल, अशी माहिती वृत्तात देण्यात आली आहे.

तमिळनाडूमध्ये स्टॅलिन यांचा द्रमुक पुन्हा सत्ता स्थापन करेल असा अंदाज जवळपास सर्व संस्थांच्या एक्झिट पोलमध्ये वर्तविण्यात आला होता. पण, यावेळी द्रमुकला केवळ ५९ जागांपर्यंत मजल मारता आली. द्रमुक यावेळी काँग्रेस, विदुथलाई चिरुथैगल कची, भारतीय कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी), भारतीय कम्युनिस्ट पक्ष आणि इंडियन युनियन मुस्लिम लीग यांच्याशी आघाडी करुन निवडणुकीच्या मैदानात उतरले होते. पण, या आघाडीला बहुमताच्या जवळ देखील पोहोचता आले नाही. आता विजय द्रमुक या आघाडीतील पक्षांचीच सत्ता स्थापनेसाठी मदत घेणार असल्याची माहिती समोर आली आहे. टीव्हीके काँग्रेसबरोबर सत्ता स्थापन करेल अशी शक्यता वर्तवली जात आहे. दरम्यान, याबाबत काँग्रेस खासदार शशिकांत सेंथिल यांना विचारण्यात आले असता, "तमिळनाडूचे हित, पक्षातील सर्वांची मतं विचारात घेऊन निर्णय घेईल", असे त्यांनी सांगितले.

# शबरीमला मंदिरासंदर्भातली याचिका केराच्या टोपलीत का फेकली नाहीत?

**महाईन्यूज । केरळ**

**सर्वोच्च न्यायालयात नऊ न्यायाधीशांच्या पीठाच्या समोर शबरीमला मंदिर प्रकरणात एक महत्त्वाचा प्रश्न उपस्थित झाला. हा प्रश्न होता तो म्हणजे अनुच्छेद २५ आणि २६ मध्ये दिलेल्या नैतिकता या शब्दाची व्याख्या कशी केली जावी? धार्मिक स्वातंत्र्याच्या मुद्द्यावर एका सीमित मर्यादिपर्यंत हा शब्द लागू होतो असंही मत मांडलं गेलं.**



### सर्वोच्च न्यायालयाने काय म्हटलंय?

जस्टिस नागरत्ना म्हणाल्या की तुम्हाला या सगळ्याशी घेणंदेणं काय? तुम्ही कोण आहात? तर सरन्यायाधीश सूर्यकांत म्हणाले की तुम्ही देशाचे मुख्य पुजारी आहात का? मी पुन्हा विचारतो वकिलांची एक संघटना आहे ती धार्मिक मुद्द्याशी स्वतःला का संलग्न करु पाहते आहे? तसंच जस्टिस नागरत्ना या पुढे म्हणाल्या यंग लॉयर्स असोसिएशनकडे दुसरं काही काम उरलेलं नाही का? बार असोसिएशनच्या कल्याणाचं काम ते करु शकत नाहीत का? किंवा त्यांना त्या कामात मदत करु शकत नाहीत का? जे वकील ग्रामीण भागातून शहरांमध्ये येतात, संघर्ष करतात त्यांना मदत करा. अशा प्रकारच्या याचिका करण्यापेक्षा समाजाला उपयोगी पडतील अशा गोष्टी करा.

तसंच यावेळी सर्वोच्च न्यायालयाने इंडियन यंग लॉयर्स असोसिएशन द्वारे दाखल करण्यात आलेल्या जनहित याचिकेवर प्रश्न उपस्थित केले. ही कुठली संघटना आहे? त्यांची याचिका सुरुवातीलाच फेटाळून टाकायला हवी होती.

सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने म्हटलं आहे की PIL चा अर्थ आता पब्लिसिटी इंटरेस्ट, प्रायव्हेट इंटरेस्ट, पैशांचा इंटरेस्ट आणि पॉलिटिकल इंटरेस्ट लिटिगेशन असा झाला आहे. तसंच यंग इंडियन लॉयर्स असोसिएशनला खडे बोल सुनावले आहेत, तुमच्याकडे आणखी काही काम नाही का? असाही तिखट प्रश्न सर्वोच्च न्यायालयाने विचारला आहे. या संघटनेला नऊ न्यायाधीशांच्या खंडपीठाने हा प्रश्न विचारला आहे की धार्मिक मुद्दा उपस्थित करुन तुम्ही याचिका का दाखल केली? तसंच तुमच्या संघटनेने हिंदू मंदिराशी संबंधित याचिका कशी काय दाखल केली? यावर असोसिएशनच्या वकिलाने सांगितलं की ही याचिका संघटनेतील महिला सदस्यांनी दाखल केली आहे.

शबरीमला मंदिराबाबत इंडियन यंग लॉयर्स असोसिएशनने दाखल केलेली याचिका कचराकुंडीत फेकून द्यायला हवी होती. या सुनावणीत ही याचिका सुनावणीला कशासाठी घेतली? तुम्ही एखाद्या पुजाऱ्याच्या वतीने ही याचिका दाखल केली असेल तर तुम्हाला ही याचिका दाखल करण्याचा अधिकार कसा काय मिळाला? जस्टीस बी.व्ही नागरत्ना म्हणाल्या आजकाल बातम्या छापून आणणं फार सोपं झालं आहे. सरन्यायाधीश महोदयांना रोज हजारो पत्रं मिळतात.

# स्क्रीनवरचा हिरो ते जनतेचा आवाज..!



तामिळनाडूच्या राजकारणात अभूतपूर्व घडामोडी घडत असून अभिनेता-नेते थलपती विजय यांच्या तामिळगा वेत्री कळघम (TVK) पक्षाने विधानसभा निवडणुकीत दमदार एंट्री करत १०८ जागांवर विजय मिळवला आहे. अवघ्या दोन वर्षांपूर्वी स्थापन झालेल्या या नवख्या पक्षाने DMK आणि AIADMK सारख्या प्रस्थापित राजकीय पक्षांना मोठा धक्का दिला आहे. हा विजय केवळ एका पक्षाचा नाही, तर राज्यातील बदलत्या राजकीय मानसिकतेचा आणि नव्या नेतृत्वावरील विश्वासाचा स्पष्ट संकेत मानला जात आहे. विजय यांच्या प्रचाराची शैली पारंपरिक राजकारणापेक्षा वेगळी आणि अधिक प्रभावी ठरली. त्यांनी युवक, रोजगार, शिक्षण आणि भ्रष्टाचारमुक्त प्रशासन यांसारख्या मूलभूत मुद्द्यांवर भर दिला. विशेषतः तरुण मतदारांना आकर्षित करण्यात त्यांना मोठे यश मिळाले. सोशल मीडिया, थेट संवाद आणि साध्या भाषेत मांडलेले विचार यामुळे विजय यांची प्रतिमा 'जनतेचा नेता' म्हणून अधिक बळकट झाली. त्यांच्या सभांमध्ये दिसलेली गर्दी आणि उत्साह हेच या विजयाचे सूचक ठरले. विजय यांचा राजकीय प्रवास हा त्यांच्या चित्रपटांमधील सामाजिक आणि राजकीय संदेशांशी जवळून जोडलेला आहे. त्यांच्या अनेक चित्रपटांमध्ये त्यांनी समाजातील समस्यांवर भाष्य केले असून, त्या भूमिका त्यांच्या राजकीय विचारसरणीशी सुसंगत असल्याचे दिसते. Sarkar (2018) हा त्यांचा एक प्रभावी पॉलिटिकल ड्रामा चित्रपट मानला जातो. या चित्रपटात निवडणूक प्रक्रियेमधील गैरप्रकार, बनावट मतदान आणि लोकशाहीतील त्रुटी यावर प्रकाश टाकण्यात आला आहे. एका मताचे महत्त्व अधोरेखित करत नागरिकांना जागरूक होण्याचा संदेश देण्यात आला. विजय यांनी परदेशातून परतलेल्या कॉर्पोरेट व्यावसायिकाची भूमिका साकारत सिस्टमला आव्हान देणाऱ्या व्यक्तीचे चित्रण केले आहे. या चित्रपटामुळे अनेक प्रेक्षकांना मतदानाच्या हक्काबद्दल नव्याने विचार करायला भाग पाडले.

Mersal (2017) हा चित्रपट कमर्शियल आणि सामाजिक विषयांचा उत्कृष्ट संगम आहे. विजय यांनी डबल रोल करत आरोग्य व्यवस्थेतील वाढता खर्च, खासगीकरण आणि सर्वसामान्य नागरिकांवर होणारा आर्थिक ताण यावर प्रश्न उपस्थित केले. या चित्रपटातील संवाद आणि संदेश इतके प्रभावी होते की त्यांनी समाजात मोठी चर्चा निर्माण केली. सामाजिक न्याय आणि समानतेचा मुद्दा यात ठळकपणे मांडण्यात आला आहे. Thuppakki (2012) हा ॲक्शन थ्रिलर चित्रपट असून राष्ट्रीय सुरक्षेचा गंभीर विषय हाताळतो. विजय यांनी भारतीय सैन्य अधिकाऱ्याची भूमिका साकारत दहशतवादाविरोधातील लढ्याचा संदेश दिला आहे. देशभक्ती, कर्तव्य आणि जबाबदारी या मूल्यांना अधोरेखित करणारा हा चित्रपट त्यांच्या लोकप्रियतेत मोठी भर घालणारा ठरला. Master (2021) या चित्रपटात तरुणांमधील गुन्हेगारी प्रवृत्ती, शिक्षणातील त्रुटी आणि योग्य मार्गदर्शनाच्या अभावाचे परिणाम दाखवले आहेत. विजय यांनी एका प्राध्यापकाची भूमिका साकारत युवकांना योग्य दिशा देण्याचा प्रयत्न केला आहे. सिस्टममधील दोष आणि मेंटरशिपचे महत्त्व अधोरेखित करणारा हा चित्रपट समाजातील वास्तव परिस्थितीवर प्रकाश टाकतो. Kaththi (2014) हा चित्रपट शेतकऱ्यांच्या समस्या, पाणीटंचाई आणि जमिनीवरील कॉर्पोरेट ताबा यांसारख्या गंभीर मुद्द्यांवर आधारित आहे. विजय यांनी डबल रोल करत शोषणाविरोधात लढणाऱ्या व्यक्तीचे प्रभावी चित्रण केले आहे. हा चित्रपट केवळ व्यावसायिकदृष्ट्या यशस्वी ठरला नाही, तर समाजात जनजागृती घडवून आणण्यातही महत्त्वाची भूमिका बजावली.
विजय यांच्या या चित्रपटांमधील भूमिका आणि त्यांनी मांडलेले सामाजिक संदेश हेच त्यांच्या राजकीय विचारांचे प्रतिबिंब असल्याचे दिसून येते. त्यामुळेच त्यांच्या राजकीय प्रवेशाला जनतेने सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. विशेषतः तरुण वर्गाला त्यांनी दिलेला रोजगार, पारदर्शकता आणि विकासाचा संदेश आकर्षित करणारा ठरला.



## अखेर त्या चर्चांवर कियाराने मौन सोडलं

बॉलीवूड अभिनेत्री कियारा अडवाणी (Kiara Advani) सध्या तिच्या आगामी 'टॉक्सिक : अ फेरी टेल फॉर ग्रोन अप्स' या चित्रपटामुळे चर्चेत आहे. या चित्रपटात अभिनेता यशसोबत ती स्क्रिन शेअर करताना दिसणार आहे. या चित्रपटात यशसोबत कियाराने इन्टिमेट सीन शूट करून त्यानंतर ते हटवण्याची मागणी केली असल्याची चर्चा होती. या चर्चांवर आता कियारा चांगलीच भडकली असून तिने सोशल मीडियावर दोन शब्दांत पोस्ट लिहित चर्चांना पूर्णविराम देत संताप व्यक्त केला आहे. कियाराने सोशल मीडियावर एका बातमीचा स्क्रीनशॉट शेअर करत बोल्ड सीन हटवण्याबाबतच्या चर्चांना "Absolute Nonsense" असे म्हणत स्पष्टपणे नाकारले आहे.

## 'तुंबाड २'मध्ये झळकणार आलिया भट्ट

आलिया भट्ट बॉलीवूडमधील लोकप्रिय अभिनेत्री आहे. तिने आतापर्यंत अनेक चित्रपटात काम करत तिच्या दमदार अभिनयाने प्रेक्षकांचं मनोरंजन केलं आहे. अभिनेत्रीने आतापर्यंत अनेक हिट चित्रपट दिले आहेत. येत्या काळात ती 'लव्ह अँड वॉर' आणि 'अल्फा' या दोन चित्रपटांतून झळकणार आहे, पण अशातच आता आलिया अजून एका बहुप्रतीक्षित चित्रपटात झळकणार असल्याची चर्चा रंगली आहे. आलिया भट्टच्या अभिनयाचं आतापर्यंत अनेकांनी कौतुक केलं आहे. तिच्या प्रत्येक भूमिकेला चाहत्यांचा खूप चांगला प्रतिसाद मिळतो. अशातच आता अभिनेत्री एका आगळ्या वेगळ्या भूमिकेतून प्रेक्षकांसमोर येण्याची शक्यता आहे. ही बातमी खरी असेल तर आलियाला अशा थ्रिलर चित्रपटातून पाहणं तिच्या चाहत्यांसाठी सुखद धक्का असेल. आलिया भट्टचं नाव 'तुंबाड २' चित्रपटाशी जोडलं जात आहे. अभिनेत्री या चित्रपटाच्या सीक्वलमध्ये झळकणार असल्याची चर्चा सुरू आहे. 'एबीपी'च्या वृत्तानुसार सोहम शाह हे गेल्या काही काळापासून त्यांच्या आगामी 'तुंबाड २' (Tumbbad 2) या चित्रपटामुळे चर्चेत आहेत.
या हॉरर चित्रपटात अभिनेता नवाजुद्दीन सिद्दीकी मुख्य भूमिकेत दिसणार आहे. या चित्रपटाची प्रेक्षक मोठ्या उत्सुकतेने वाट पाहत आहेत. २०१८ मध्ये आलेल्या 'तुंबाड' या चित्रपटाच्या सीक्वलमध्ये आता बॉलिवूड अभिनेत्री आलिया भट्टची एंट्री झाली आहे.



# हार्दिकच मुंबई इंडियन्सचा कॅप्टन

## संघ व्यवस्थापनाचा सपोर्ट पण दोन स्टार खेळाडूंना तंबी

**महाईन्यूज | मुंबई**

**मुंबई इंडियन्सला इंडियन प्रीमिअर लीग २०२६ मध्ये साजेशी कामगिरी करता आलेली नाही. १० पैकी ३ सामन्यांत त्यांनी विजय मिळवला आहे आणि प्ले ऑफचे आव्हान जवळपास संपल्यात जमा झाले आहे. असे असले तरी संघ व्यवस्थापन हार्दिक पांड्याला कर्णधारपदावरून हटवण्याची घाई करणार नाही. पाचवेळच्या विजेत्या संघाने २०२४ मध्ये रोहित शर्माकडून कर्णधारपद काढून हार्दिककडे सोपवले होते. तेव्हा प्रचंड टीका झाली होती. MI चा कर्णधार म्हणून हार्दिकला आयपीएलच्या मागील तीन पर्वात साजेशी कामगिरी करता आलेली नाही.**



इंडियन एक्स्प्रेसने दिलेल्या वृत्तानुसार संघाच्या निराशाजनक कामगिरीचा हार्दिकच्या कर्णधारपदावर कोणताच परिणाम होणार नाही. पण, व्यवस्थापनाकडून काही प्रमुख खेळाडूंना इशारा दिला जाणार आहे आणि त्यांना अपेक्षित कामगिरी करण्यास सांगितले जाणार आहे. स्पर्धेच्या बदलत्या स्वरूपाशी जुळवून घेण्यात संघाने उशीर केला आहे, असा दावा अहवालात केला गेला आहे. हार्दिकने आयपीएलमध्ये दोन संघांचे ( GT - MI) नेतृत्व करताना ६८ सामन्यांपैकी ३७ सामने जिंकले आहेत, तर ३१ सामन्यांमध्ये त्याला पराभव पत्करावा लागला आहे.

"फ्रँचायझी व्यवस्थापन हार्दिक पांड्याला पाठिंबा देत आहे आणि संघाच्या संघर्षाला त्याच्या नेतृत्वाची कमतरता मानत नाही. उलट, स्पर्धेतील बदलत्या खेळण्याच्या शैलीशी जुळवून घेण्यास मुंबई इंडियन्सने उशीर केला आहे, असे त्यांना वाटते," असे अहवालात म्हटले आहे.

मुंबई इंडियन्सला दुखापतींचा सामनाही करावा लागला आहे. रोहित शर्मा पाच सामन्यांना मुकला आहे आणि त्याने खेळलेल्या ५ सामन्यात ५५.२५ च्या सरासरीने २२१ धावा केल्या आहेत.



# दुखापतींचा ससेमिरा, १२ शस्त्रक्रिया तरीही हरला नेहरा नाही

**महाईन्यूज | नवी दिल्ली**

**२००३ वर्ल्डकपमधला एका फोटोबाबत फारशी चर्चा होत नाही. डरबान इथे ६ विकेट्स पटकावल्यानंतरचा तो फोटो नाही. तो स्पेल टाकल्यानंतर थोड्या वेळानंतर घेतलेला फोटो. नेहरा बाऊंड्रीजवळ खाली वाकला आहे. हात गुडघ्यावर आहेत. थकला आहे. काही मिनिटांपूर्वी नॉशिया टाळण्यासाठी त्याने केळं खाल्लं आहे. क्षणार्धात तो उलटी करतो, मैदानातच. हजारो चाहते पाहत असतात. टेलिव्हिजन कॅमेरेही हे दृश्य टिपतात. तो स्वत:ला सावरतो.**



### दुखापतीमुळे नेहराची चार वर्ष वाया

त्या दुखापतीमुळे नेहराची चार वर्ष वाया गेली. तेवढ्या काळात जग पुढे जातं. अनेक नवे खेळाडू समोर येतात. नेहराने वाट पाहिली. त्याने खेळणं सोडलं नाही. २०११ वर्ल्डकप. पाकिस्तानविरुद्धच्या सेमी फायनलमध्ये त्याने ३३ धावांत २ विकेट्स पटकावल्या. दक्षिण आफ्रिकेविरुद्ध शेवटच्या षटकात १६ धावा दिल्यामुळे क्वार्टर फायनलच्या लढतीतून त्याला वगळण्यात आलं होतं. पाकिस्तानविरुद्ध त्याने त्याचं कौशल्य दाखवून दिलं. पण क्षेत्ररक्षण करताना त्याच्या बोटाला फ्रॅक्चर झालं. त्याचा वर्ल्डकप तिथेच संपला. धोनीचा श्रीलंकेविरुद्धचा उत्तुंग षटकार त्याने ड्रेसिंगरुमधून पाहिला. तो संघाचा अविभाज्य भाग होता.

तो प्रसंग किती कठीण असेल ते आपण समजू शकतो. तुम्ही दुखापतग्रस्त असतानाही कारकिर्दीतला सर्वोत्तम असा स्पेल टाकला आहे. पण तो स्पेल होत नाही तोवर शरीराने तुमची साथ सोडली आहे. त्या खेळाडूचं नाव आहे- आशिष नेहरा. कारकिर्दीत नेहरा जितकं भारतासाठी खेळला त्यापेक्षा कैक जास्त दुखापतींमुळे खेळू शकला नाही. शरीर सातत्याने साथ सोडत असतानाही नेहरा विजीगीषु वृत्ती जागवत संघासाठी खेळत असे. ब्रेकफास्ट विथ चॅम्पियन्स कार्यक्रमात गौरव कपूरला दिलेल्या मुलाखतीत भारताचा माजी कर्णधार सौरव गांगुलीने नेहराच्या या मनोवृत्तीचं कौतुक केलं होतं. त्याची वेदना सोसण्याची क्षमता विलक्षण आहे. शरीर दुखापतींनी जर्जर होऊनही तो खचून जात नाही, खेळण्यासाठी तय्यार होतो.

१८ वर्ष नेहरा दुखऱ्या शरीराला तोंड देत खेळत राहिला. सात कर्णधारांच्या नेतृत्वात खेळला. टेस्ट, वनडे, टी२० सगळं खेळला. या काळात १२ शस्त्रक्रियांना तो सामोरं गेला. त्याचे संघातले सहकारी त्याला 'मिस्टर ग्लास' म्हणत असत. काच जशी संवेदनशील असते तसं नेहराचं शरीर होतं. कधीही साथ सोडायचं पण नेहरा खेळत राहायचा.

निवृत्ती स्वीकारल्यानंतर दिल्लीकर नेहराने गोव्याला स्थायिक होण्याचा निर्णय घेतला. त्याने क्रिकेट अकादमी सुरू केल्या. दिल्लीत हॉस्पिटॅलिटी इंडस्ट्रीचा तो भाग आहे. आयपीएल स्पर्धेतील गुजरात टायटन्स संघाचा तो मुख्य प्रशिक्षक आहे. वर्षाला ३.५ कोटी रुपये त्याचं प्रशिक्षक म्हणून मानधन आहे.

आणि हे सगळं असलं तरी आजही तो तो बेसिक फोन वापरतो. टीम इंडियाचा माजी कर्णधार आणि नेहराचा मित्र रोहित शर्मा गंमतीत म्हणतो की सोशल मीडियावर आशिष नेहराचा ट्रेंड असतो पण तो स्वत: यातलं काहीही पाहू शकत नाही कारण तो तिथे नाहीयेच. नेहरा इन्स्टाग्रामवर नाही. ट्वीटर (एक्स), फेसबुकवर नाही. सोशल मीडियावरच नाही. २०२६ मध्ये असा माणूस असू शकतो यावर कदाचित विश्वास बसणार नाही पण नेहरा सगळ्याला अपवाद आहे. तो अवलिया आहे. दिल्लीच्या सदर बाजार परिसरात लहानाचा मोठा झालेला नेहरा वीरेंद्र सेहवागच्या स्कूटरवर मागे बसून सरावाला जायचा. नेहराची गोष्ट प्रेरणादायी आणि त्याचवेळी अचंबित करू शकते. नेहराचे बाबा दिल्ली सिव्हिल सप्लाईज कॉर्पोरेशनमध्ये काम करायचे. आई संस्कृत शिक्षिका. मध्यमवर्गीय कुटुंब. क्रिकेट खेळणं शक्य होतं पण कायमच खेळत राहता येईल याची शाश्वती नव्हती.

सोनेट क्रिकेट क्लबमध्ये तो पोहोचला. तारक सिन्हा ज्यांना आता 'उस्तादजी' म्हटलं जातं त्यांनी या उंचपुऱ्या वेगवान गोलंदाजाला पाहिलं. त्यांनी नेहराचा रनअप कमी केला. अधिक घोटीव केला. त्याच्या शरीरावर ताण येऊ नये असा केला. तारक यांच्या सूचनांमुळे आशिष खेळू शकला. चेंडू टप्पा पडल्यानंतर स्विंग करण्यात आशिष माहीर होता. अशाच एका स्पेलने २००३ वर्ल्डकपमध्ये इंग्लंडच्या फलंदाजांची दाणादाण उडाली होती.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

ePaper

epaper.mahaenews.com

। बुधवार ।

दि. 06 मे 2026 ।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# प्रेक्षागृह गैरप्रकार; १० जणांना नोटीस

महाईन्यूज ।
पिंपरी- चिंचवड

## ५० लाखांचा गैरप्रकार उघड

रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहातील भाडे व अनामत रक्कम वसुलीत अनियमितता; १० कर्मचाऱ्यांना नोटीस देत ५०.७० लाखांची वसुली, दहा दिवसांत रक्कम जमा व खुलासा करण्याचे आदेश.

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात अनामत रक्कम आणि भाडे वसुलीत अनियमितता झाल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी एकूण १० कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावत ५० लाख ७० हजार ६२६ रुपयांची वसुली करण्याचे आदेश दिले आहेत. संबंधित कर्मचाऱ्यांना दहा दिवसांच्या आत रक्कम जमा करण्यास आणि खुलासा सादर करण्यास सांगण्यात आले आहे.


सन २०१८ ते २०२४ या कालावधीत नाट्यगृहात कार्यरत असलेल्या लिपिक व मुख्य लिपिकांनी कार्यक्रमांचे हिशेब व्यवस्थित न ठेवल्याचे आढळले. काही प्रकरणांमध्ये कार्यक्रमाचे भाडे महापालिकेत जमा न करता स्वतःकडे ठेवल्याचेही निदर्शनास आले आहे. हा प्रकार तब्बल सहा वर्षे सुरू असल्याने महापालिकेचे मोठे आर्थिक नुकसान झाल्याचे समोर आले.

क्रीडा विभागाने प्राथमिक चौकशी करत रजिस्टर तपासले असता कार्यक्रमांची संख्या आणि जमा झालेली रक्कम यामध्ये मोठी तफावत आढळली. त्यानंतर अंतर्गत लेखापरीक्षणात (ऑडिट) लाखो रुपयांची रक्कम तिजोरीत न भरल्याचे स्पष्ट झाले. तसेच, नाट्यगृह भाड्याने देताना अनामत रक्कम न घेणे, भाडे वसुलीची परस्पर विल्हेवाट लावणे आणि साहित्याचे नुकसान झाल्याचेही उघड झाले.

या प्रकरणात मुख्य लिपिक कांतीलाल वाघेरे, उमेश बांदल, मनोज भूतकर (सेवानिवृत्त) तसेच लिपिक राहुल ककरोठी, अभिषेक हिंगे, संकेत जंगम, संतोष बोत्रे, अमर निकाळजे, अतुल काळे आणि अशोक केंगले यांचा समावेश आहे. लेखापरीक्षण अहवालानुसार प्रत्येकाकडून वसूलपात्र रक्कम निश्चित करण्यात आली आहे.

दरम्यान, "कामकाजात गैरवर्तन, हलगर्जीपणा आणि अनियमितता आढळल्याने महापालिकेचे आर्थिक नुकसान झाले आहे. त्यामुळे संबंधित १० कर्मचाऱ्यांकडून ५०.७० लाखांची वसुली करण्यात येणार असून त्यांच्याकडून खुलासा देखील मागविण्यात आला आहे," अशी माहिती सहआयुक्त मनोज लोणकर यांनी दिली.






# कामाला विषय नाहीत, तर समिती बरखास्त करा!

## तीन महिने उलटले तरी एकही प्रस्ताव नाही; संतापलेल्या सदस्यांनी प्रशासनाला धरले धारेवर

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या प्रशासकीय कारभारातील ढिसाळपणा आणि विधी समितीसारख्या वैधानिक समितीकडे होणारे दुर्लक्ष यावरून सोमवारी पालिकेत मोठा गदारोळ पाहायला मिळाला. मागील तीन महिन्यांपासून विषय पत्रिकेवर प्रशासनाकडून एकही प्रस्ताव न आल्याने संतप्त झालेल्या विधी समितीच्या सदस्यांनी अधिकाऱ्यांची चांगलीच कानउघाडणी केली. "जर समितीला अधिकार नसतील आणि कामच द्यायचे नसेल, तर ही समिती बरखास्त का करत नाही?" असा आक्रमक पवित्रा सदस्यांनी घेतला.**

सोमवारी सभापती सुजाता बोराटे यांच्या अध्यक्षतेखाली विधी समितीची पाक्षिक बैठक पार पडली. विशेष म्हणजे, या बैठकीच्या विषयपत्रिकेवर एकही विषय नव्हता. तरीही लोकप्रतिनिधींनी ही बैठक तब्बल दोन तास सुरू ठेवली आणि प्रशासकीय अनास्थेचा पाढा वाचला. "विधी समितीचे अधिकार नेमके काय आहेत? कायदेशीर पेच असलेले विषय समितीकडे न येता थेट सर्वसाधारण सभेकडे (GB) कसे जातात?" अशा प्रश्नांची सरबत्ती सदस्यांनी केली.



### ऐनवेळचा एकमेव विषय मंजूर

दिवसभर चाललेल्या या नाट्यमय घडामोडींनंतर, प्रशासनाने बैठकीच्या शेवटी ऐनवेळी एक विषय पटलावर ठेवला. सदस्यांनी आपला रोष व्यक्त केल्यानंतर या एकमेव विषयाला मान्यता देण्यात आली. मात्र, आगामी काळात प्रशासनाने आपली कार्यपद्धती न सुधारल्यास हे प्रकरण अधिक चिघळण्याची चिन्हे आहेत.

"विधी समिती ही महापालिकेची एक महत्त्वाची वैधानिक समिती आहे, परंतु प्रशासन जाणीवपूर्वक या समितीच्या अधिकारांकडे दुर्लक्ष करत असल्याचे दिसते. मागील तीन महिन्यांपासून विषयपत्रिकेवर एकही विषय न येणे ही गंभीर बाब आहे. जर प्रशासनाला ही समिती महत्त्वाची वाटत नसेल आणि सर्व विषय परस्पर सर्वसाधारण सभेकडेच न्यायचे असतील, तर ही समितीच बरखास्त करा, अशी आमची स्पष्ट भूमिका आहे.

- सुजाता बोराटे (सभापती, विधी समिती)

### अधिकाऱ्यांची टोलवाटोलवी

बैठकीला सहआयुक्त मनोज लोणकर, कायदा सल्लागार राजेश आगळे, प्रशासन विभागाचे सहायक आयुक्त अजिंक्य येळे यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. यावेळी सदस्यांनी अधिकाऱ्यांवर पुढील गंभीर आरोप केले: प्रशासकीय मनमानी: विधी समितीला डावलून अनेक महत्त्वाचे विषय परस्पर मंजूर केले जातात. गैरहजेरी: अनेकदा महत्त्वाच्या बैठकांना वरिष्ठ अधिकारी दांडी मारतात. अपमानास्पद वागणूक: "समितीला काही काम नाही" असे सांगून अधिकारी लोकप्रतिनिधींच्या अधिकारांची पायमल्ली करतात. "प्रशासनाकडून जाणीवपूर्वक विधी समितीच्या अधिकारांवर गदा आणली जातेय. जर विषयच आणले जाणार नसतील, तर केवळ नावापुरती समिती ठेवण्यात काय अर्थ?" अशी नाराजी विधी समिती सदस्यांनी व्यक्त केली.

# चिखलीच्या सौरभ गायकवाडची सर्वोच्च न्यायालयात भरारी

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**'परिस्थितीवर मात करण्याची जिद्द आणि कठोर परिश्रम असेल तर आकाशही ठेंगणे ठरते', याचाच प्रत्यय चिखली येथील आयआयबीएम (IIBM) कॉलेजचा विद्यार्थी सौरभ सुरेश गायकवाड याने आणून दिला आहे. अत्यंत सामान्य परिस्थितीतून शिक्षण घेत सौरभने आपली गुणवत्ता सिद्ध केली असून, त्याची भारतीय सर्वोच्च न्यायालय (Supreme Court of India) येथे 'ज्युनिअर कोर्ट अटेंडंट' या अत्यंत मानाच्या पदावर निवड झाली आहे. त्याच्या या यशामुळे दालवडी- फलटण गावाचे नाव संपूर्ण देशात उज्वल झाले आहे.**




"आमच्या संस्थेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना देश-विदेशात १००% रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या जातात. केवळ खासगी क्षेत्रच नव्हे, तर विद्यार्थ्यांनी सरकारी नोकरीतही यश मिळवावे, यासाठी आम्ही त्यांना सातत्याने मार्गदर्शन करतो. हॉस्पिटॅलिटी हे एक अफाट विस्तारलेले क्षेत्र आहे; जिद्दीच्या जोरावर विद्यार्थी या उद्योगासह सरकारी सेवांमध्येही आपले उज्वल भविष्य घडवू शकतात."

- श्री. अमोल भागवत (विभागप्रमुख, IIBM)

"सौरभची निवड ही आमच्या संस्थेसाठी आणि संपूर्ण चिखली परिसरासाठी अभिमानाची गोष्ट आहे. अत्यंत गरिबीतून शिकून, कोणतीही तक्रार न करता केवळ मेहनतीच्या जोरावर त्याने सर्वोच्च न्यायालयापर्यंत मजल मारली आहे. ग्रामीण भागातील मुलांमध्ये गुणवत्ता असते, त्यांना योग्य मार्गदर्शनाची जोड मिळाली की ते असाच इतिहास घडवतात. सौरभचा प्रवास हा इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरेल."

- डॉ. धनंजय वर्णेकर (संस्थापक अध्यक्ष, आयआयबीएम कॉलेज)

### हॉस्पिटल मॅनेजमेंट ते सर्वोच्च न्यायालय

सौरभ गायकवाड याने आयआयबीएम कॉलेजमधून हॉस्पिटल मॅनेजमेंटची पदवी मिळवली आहे. घरची आर्थिक परिस्थिती बेताची असतानाही त्याने कधीही हार मानली नाही. अभ्यासातील सातत्य आणि मेहनतीच्या बळावर त्याने हे यश संपादन केले आहे. एका ग्रामीण पार्श्वभूमीच्या विद्यार्थ्याने थेट देशाच्या सर्वोच्च न्यायालयात स्थान मिळवल्याने सर्वच स्तरांतून त्याच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

### यशात मार्गदर्शकांचा मोलाचा वाटा



सौरभच्या या यशात संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. धनंजय वर्णेकर, माननीय नगरसेविका शितल धनंजय वर्णेकर, प्राचार्य प्रदीप फुलकर, विभाग प्रमुख अमोल भागवत, अनिकेत वंजारी आणि प्रतीक्षा डफळ यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. कॉलेजने उपलब्ध करून दिलेल्या शैक्षणिक वातावरणामुळे आणि प्रोत्साहनामुळे स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी मोठे बळ मिळाल्याचे सौरभने नमूद केले.

# भाजपाचा झंझावात! पण, पिंपरी-चिंचवडमध्ये विजयोत्सव नाही!

## नसरापूर, चाकण अत्याचाराच्या घटनांचा निषेध : शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांनी दिले 'त्या' मतदारांना धन्यवाद!

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**देशातील पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकांचे निकाल जाहीर झाले असून, भारतीय जनता पार्टीने यातील पश्चिम बंगाल, आसाम आणि पाँडेचरी या तीन राज्यांमध्ये ऐतिहासिक यश मिळवत भगवा फडकवला आहे. या दिग्विजयासोबतच महाराष्ट्रातील अहिल्यानगर येथील राहुरी पोटनिवडणुकीत भाजप उमेदवार अक्षय कार्डिले आणि बारामती पोटनिवडणुकीतील महायुतीच्या उमेदवार उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी प्रतिस्पर्ध्यांचा धुव्वा उडवत प्रचंड मताधिक्याने विजय संपादन केला आहे. या दुहेरी विजयाचा जल्लोष करण्यासाठी आज पिंपरी चिंचवड शहरात अत्यंत साधेपणाने विजयोत्सव केला आहे.**




नसरापूर आणि चाकण-म्हाळुंगे येथील अत्याचाराच्या घटनेच्या पार्श्वभूमीवर भारतमातेचे प्रतिमा पूजन झाले आणि पक्षाचे राष्ट्रीय नेतृत्त्वाचे अत्यंत साधेपणाने अभिनंदन करण्यात आले. पुणे जिल्ह्यात मानवतेला काळींमा फासणाऱ्या घटना घडल्यामुळे ढोल-ताशा आणि गुलाल उधळणे टाळण्यात आले, अशी माहिती शहराचे वरिष्ठ उपाध्यक्ष संजय पटनी यांनी दिली.

यावेळी शहराध्यक्ष श्री. शत्रुघ्नबापू काटे, विधान परिषदेच्या आमदार मा. उमाताई खापरे, माजी खासदार श्री. अमरजी साबळे, संघटन सरचिटणीस श्री. मोरेश्वरजी शेडगे, उपमहापौर मा. शर्मिलाजी बाबर, प्रदेश कार्यकारीणी सदस्य श्री. सदाशीवजी खाड्ये, दक्षिण भारतीय मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष श्री. राजेशजी पिल्ले, महिला शहराध्यक्षा सौ. सुजाताजी पालांडे, सरचिटणीस सौ. वैशालीजी खाड्ये, श्री. राजूभाऊ दुर्गे, श्री. मधुकरजी बच्चे यांच्यासह विविध मोर्चाचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण असूनही समाजाप्रती संवेदनशीलता जपत कार्यक्रम पार पडला. विजयाबद्दल आनंद व्यक्त करताना उपस्थितांनी विकासाच्या अजेंड्याला अधिक बळ देण्याचा निर्धार व्यक्त केला. तसेच आगामी काळात जनतेच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी पक्ष अधिक जोमाने काम करेल, असा विश्वासही व्यक्त करण्यात आला.

> पाचपैकी तीन राज्यांतील जनतेने भाजपाच्या विकासकामांना कौल दिला आहे. तसेच राहुरीच्या जनतेने अक्षय कार्डिले आणि बारामतीकरांनी पुन्हा एकदा महायुतीच्या उमेदवार सुनेत्रा पवार यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून विरोधकांना चोख प्रत्युत्तर दिले आहे. या ऐतिहासिक विजयाचा जल्लोष आम्ही साजरा करणार नाही. कारण, दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर आणि दिवंगत आमदार शिवाजी कर्डिले यांच्या निधनानंतर ही निवडणूक घ्यावी लागली. तसेच, नसरापूर आणि चाकणमधील अत्याचाराची घटना मन हेलावणारी आहे. त्यामुळे विजयोत्सव केला नाही. केवळ 'त्या' मतदारांना धन्यवाद दिले आहेत.
>
> **— शत्रुघ्न (बापू) काटे**
> **(अध्यक्ष, भाजपा पिंपरी चिंचवड शहर जिल्हा)**

# उपक्रमशील आणि प्रयोगशील शिक्षकांची गरज : डॉ. संगीता गोळे

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**विद्यार्थी केंद्रबिंदू मानून शिक्षकांनी सातत्याने आपल्या व्यापक अनुभवातून नाविन्यपूर्ण उपक्रम राबविले, तर विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाविषयी कुतूहलाची ज्योत कायम तेवत राहील. आताच्या नव्या पिढीला अशा उपक्रमशील आणि प्रयोगशील शिक्षकांची गरज आहे, असे शैक्षणिक सल्लागार तथा मार्गदर्शक डॉ. संगीता गोळे यांनी सांगितले.**





## 'आपण का आणि कोणासाठी शिकवतो'

डॉ. संगीता गोळे यांनी सांगितले की, बदलत्या सामाजिक, भावनिक गरजा आणि शिक्षकांचे भावनिक स्वास्थ्य याचा विद्यार्थ्यांवर परिणाम होता कामा नये. प्राचार्या डॉ. बिंदू सैनी यांनी सांगितले की, 'आपण का आणि कोणासाठी शिकवतो' यावर विचार मंथन झाले पाहिजे. शिक्षणामुळे सूक्ष्म पण प्रभावी बदल होत असतो. अध्यापनातून उद्देशाकडे झालेल्या तत्त्वज्ञानात्मक परिवर्तनाचे ते प्रतीक असते. शिक्षकांनी धोरणांपलीकडे जाऊन शिक्षणाच्या मूळ उद्देशाचा विचार केला पाहिजे. आता विद्यार्थ्यांमध्ये आपलेपणाची भावना निर्माण करणाऱ्या शाळांची गरज आहे.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या रावेत येथील एस. बी. पाटील पब्लिक स्कूल मध्ये "संयुक्त राष्ट्रांचे शाश्वत विकास उद्दिष्ट ४" अंतर्गत 'खोज' या आंतर जिल्हा शिक्षक परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये पुणे, मुंबई, नाशिक येथील १५० पेक्षा जास्त शिक्षकांनी सहभाग घेतला होता. 'जीवन कौशल्ये : आनंदी वर्ग खोल्यांकडे एक प्रवास' या विषयावर आधारित या परिषदेचे हे दुसरे वर्ष होते. यावेळी डॉ. गोळे यांनी मार्गदर्शन केले.

यावेळी एस. बी. पाटील पब्लिक स्कूलच्या प्राचार्या डॉ. बिंदू सैनी, आशा एज्युकेशनल सोसायटीचे प्रतिनिधी श्रुंगी दुबे, द ऑर्किड्स स्कूलच्या डॉ. नम्रता मजहिल, परीक्षक डॉ. लीना पिंपळे, डॉ. अमृता जोशी, उपप्राचार्या पद्मावती बंडा, मुख्याध्यापिका शुभांगी कुलकर्णी, नाशिक येथील मीना भुजबळ स्कूल ऑफ एक्सलन्सच्या प्राचार्या शुभ्रा वर्मा, के. के. वाघ महाविद्यालयाचे प्रतिनिधी, द नॉलेज हॅबिटॅट स्कूल पुणे, सुरजबा विद्या मंदिर मुंबई, एम. पी. शाह इंग्लिश हायस्कूल मुंबई, अंतर भारती बालग्राम लोणावळा, आणि एस. बी. पाटील पब्लिक स्कूल, पुणे यांच्यासह विविध शाळा महाविद्यालयातील १५० पेक्षा अधिक शिक्षक, प्रतिनिधी उपस्थित होते.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली या परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. परीक्षक डॉ. लीना पिंपळे, डॉ. अमृता जोशी यांनीही मार्गदर्शन केले. परिषदेसाठी उपप्राचार्या पद्मावती बंडा, मुख्याध्यापिका शुभांगी कुलकर्णी यांनी परिश्रम घेतले. सूत्र संचालन अभया रविशंकर आणि स्वलेहा मुजावर यांनी केले.


PRIYADARSHANI SCHOOL & JR COLLEGE
MOSHI
43 YEARS OF
NURTURING VALUES,
EXCELLENCE AND
TOMORROW'S LEADERS.
ADMISSIONS OPEN FOR AY 2026-27
Grade Nursery to Grade V
WHY CHOOSE PRIYADARSHANI SCHOOL?
43 Years of Excellence in Education | Advanced Robotics & Computer Labs
Experienced and Dedicated Faculty | Multiple Sports Grounds for All-Round Development
Proven 100% Results in Grade X | A Perfect Blend of Tradition and Innovation
+91 9890613333 | +91 9373073077
pgosm05@gmail.com
www.priyadarshanischoolmoshi.in